**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्त विभाग**
**प्रादेशिक बातमीपत्र**
**सकाळी 07 वाजून 10 मि**

**दिनांकः17.08.2025** **वारःरविवार**

---

1. प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत सोलापूर जिल्ह्यात उभारण्यात आलेल्या सदनिकांचं आज मुख्यमंत्र्यांच्या हस्ते वितरण.

२. मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर सर्किट बेंचचं आज उद्घाटन

३. श्रीकृष्ण जन्माष्टमी आणि गोपाळकाला राज्यभरात उत्साहाने साजरे, दहीहंडी फोडण्यासाठी गोविंदांमध्ये थरारक चुरस

४. ज्येष्ठ अभिनेत्री ज्योती चांदेकर यांचं निधन

आणि

५. राज्याच्या अनेक भागांत पावसाची संततधार, पुढील चार दिवस अतिवृष्टीचा हवामान विभागाचा इशारा

**<u>मुख्यमंत्री-सदनिकालोकार्पण</u>**

प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत, सोलापूर जिल्ह्यातील दहिटणे आणि शेळगी इथे पहिल्या टप्प्यात उभारण्यात आलेल्या १ हजार ३४८ सदनिकांचं वितरण आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, ग्रामविकास आणि पंचायतराज मंत्री तसंच सोलापूर जिल्ह्याचे पालक मंत्री जयकुमार गोरे, गृहनिर्माण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर उपस्थित राहणार आहेत. प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत उभारण्यात येणारा हा गृहप्रकल्प सार्वजनिक-खाजगी भागीदारी तत्वावर बांधण्यात येत आहे.

**<u>कोल्हापूर-सर्किटबेंच</u>**

मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर इथल्या सर्किट बेंचचं, सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई यांच्या हस्ते आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत आज  उद्घाटन होणार आहे. या सर्कीट बेंचच्या माध्यमातून सहा जिल्ह्यांसाठी न्यायदानाची सोय उपलब्ध होणार आहे. या सर्किट बेंचमध्ये नागरी, फौजदारी, कामगार, मालमत्ता, सार्वजनिक हक्क अशा विविध प्रकारचे खटले चालवण्यात येतील.  मुंबई, नागपूर आणि छत्रपती संभाजीनगर इथले न्यायमूर्ती, तात्पुरत्या स्वरूपात कोल्हापूर इथे  नियुक्त होऊन न्यायप्रकरणं चालवतील.

**<u>दहीहंडी-मुख्यमंत्री</u>**

राज्यात काल श्रीकृष्ण जन्माष्टमी आणि गोपाळकाल्याचा  सण उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्ताने राज्यात अनेक ठिकाणी दहीहंड्यांचं आयोजन करण्यात आलं होत. उंचच उंच बांधलेली दहीहंडी फोडण्यासाठी लाखो रुपयांची बक्षीसं  लावण्यात आली होती. दहीहंडी फोडण्यासाठी उत्साही गोविंदा पथकांनी थरारक  मानवी मनोरे रचले.

ठाण्यात, प्रताप सरनाईक फाउंडेशन आणि संस्कृती युवा प्रतिष्ठान आयोजित संस्कृती दहीहंडी मध्ये, 'कोकण नगरचा राजा' या गोविंदा पथकाने  १० मानवी थर रचत, विश्वविक्रमाची नोंद केली. पथकाला २५ लाख रुपयांचं पारितोषिक जाहीर करण्यात आलं.

मुंबईतील घाटकोपर इथल्या लालबहादूर शास्त्री मार्गावर आयोजित दहीहंडी उत्सवात मुख्यमंत्री देवेंद्र  फडणवीस यांनी तिथे  उपस्थित असलेल्या सैन्य दलातील जवानांना भेटून त्यांच्याशी संवाद साधला. या वेळी सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार, आमदार प्रवीण दरेकर, उपस्थित होते.

“ऑपरेशन सिंदूर द्वारे भारतीय सैन्यदलानं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा निर्धार आणि विचार प्रत्यक्षात उतरवला असून, दहीहंडी उत्सवातून गोविंदा पथकांनी सैन्य दलाच्या शौर्याला सलाम करण्याचं  सुंदर काम केलं  आहे असं मुख्यमंत्री यावेळी बोलताना म्हणाले.

केंद्रीय मंत्री पीयूष गोयल यांनी  उत्तर मुंबईत आयोजित विविध दहीहंडी सोहळ्यांना उपस्थित राहून गोविंदा पथकांचा सन्मान केला. दहीहंडी हा परंपरा, एकता आणि शौर्याचा उत्सव आहे असं ते यावेळी बोलताना म्हणाले.

नागपूरच्या महाल परिसरातील बडकस इथल्या दहीहंडीला केंद्रीय मंत्री नितीन गडकरी उपस्थित होते.

**<u>अजितपवार-सांगलीदौरा</u>**

विद्यार्थ्यांना कृत्रिम बुद्धीमत्तेचं शिक्षण मिळावं यासाठी अर्थसंकल्पात ५०० कोटी रुपयांच्या निधीची तरतूद करण्यात आली आहे. गरज पडल्यास या निधीत वाढ करण्यात येईल असं उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी काल सांगली इथे सांगितलं. इस्लामपूर इथलं प्राध्यापक डॉ. एन .डी. पाटील विधी महाविद्यालय आणि श्रीमती सरोज नारायण पाटील मानसशास्त्र संशोधन केंद्राचं उद्घाटन तसंच प्राध्यापक डॉ. एन. डी. पाटील बहुउद्देशीय सभागृहाचं भूमिपूजन पवार यांच्या हस्ते करण्यात आलं, त्यावेळी ते बोलत होते. आपल्या सांगली दौऱ्यात त्यांनी जिल्ह्यातील विविध विकासकामं तसंच योजनांची जिल्हास्तरीय आढावा बैठक घेतली. या बैठकीत म्हैसाळ उपसा सिंचन योजना, शक्तिपीठ महामार्ग, तसंच केंद्र शासन आणि राज्य शासनाच्या सुरू असलेल्या विविध विकास योजनांचा आढावा घेण्यात आला. समृद्धी महामार्गाबाबत बोलताना अजित पवार म्हणाले...

**<u>साउंड बाईट (49 सेकंद)</u>**

**<u>आंदोलन</u>**

गेल्या अनेक वर्षांपासून रखडलेल्या मुंबई-गोवा महामार्गाचं काम लवकरात लवकर पूर्ण व्हावं यासाठी रत्नागिरी तालुक्यातल्या निवळी इथे काल मराठी पत्रकार परिषदेतर्फे आंदोलन करण्यात आलं. महामार्गाचं काम पूर्ण होण्याकडे सरकारचं लक्ष वेधून घेणं हे या आंदोलनाचं मुख्य उद्दिष्ट होतं. रत्नागिरी आणि लांजा तालुक्यातील मराठी पत्रकार परिषदेचे पदाधिकारी आणि सदस्य आंदोलनात सहभागी झाले होते.

**<u>चिमूरक्रांतीदिन</u>**

१६ ऑगस्ट १९४२ या दिवशी झालेल्या चिमूर क्रांती दिनानिमित्त काल राज्याच्या आदिवासी विकास विभागाचे मंत्री तसंच चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री डॉक्टर अशोक उईके यांनी शहिदांना श्रध्दांजली वाहिली. यावेळी त्यांनी चिमूर इथलं हुतात्मा स्मारक आणि किल्ला परिसरातील शहीद स्मारकावर पुष्पचक्र अर्पण करून अभिवादन केलं.

यावेळी हुतात्मा स्मारक ते किल्ला परिसर पदयात्रा काढण्यात आली. उईके यांनी, चिमुर स्वातंत्र्य संग्रामातील सैनिकांच्या कुटुंबियांची, त्यांच्या  घरी जाऊन भेट घेतली.

**<u>वळवी-कोन्ग्रेसप्रवेश</u>**

माजी मंत्री आणि भाजपा नेते पद्माकर वळवी यांनी काल बुलढाणा इथे  कॉंग्रेस पक्षात प्रवेश केला. माजी मंत्री वसंत पुरके यावेळी उपस्थित होते.

**<u>अंतराळवीरशुक्ला</u>**

आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकला भेट देणारे पहिले भारतीय म्हणून इतिहास घडविणारे अंतराळवीर शुभांशू शुक्ला आज पहाटे मायदेशी परतले.  दिल्ली आंतरराष्ट्रीय विमानतळावर केंद्रीय मंत्री डॉ. जितेंद्र सिंग, दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता, इस्रोचे अध्यक्ष डॉ. व्ही नारायणन आणि शुकला यांच्या कुटुंबीयांनी त्यांचं स्वागत केलं. नासाच्या एक्झिओम 4 मोहिमेवरून परतल्यानंतर त्यांचं शरीर पृथ्वीवरील वातावरणात पुन्हा सरावण्याच्या अनुषंगानं अमेरिकेत त्यांचं पुनर्वसन करण्यात आलं होतं, तिथून ते आज भारतात परतले. २५ जून रोजी केनेडी स्पेस सेंटरवरून त्यांनी अंतराळात झेप घेतली होती.

**<u>निधन-ज्योतीचांदेकर</u>**

ज्येष्ठ मराठी अभिनेत्री ज्योती चांदेकर यांचं काल पुण्यात निधन झालं. त्या ६९ वर्षांच्या होत्या. 'गुरु',  'मी सिंधुताई सपकाळ', 'तिचा उंबरठा' अशा अनेक चित्रपटांमध्ये तसंच 'मिसेस आमदार सौभाग्यवती' यासह अनेक नाटकांमध्ये त्यांनी विविध भूमिका साकारल्या. अनेक मालिकांमध्येदेखील त्यांनी आपल्या अभिनयाची छाप उमटवली होती. ज्योती चांदेकर यांच्या पार्थिव देहावर आज सकाळी पुण्यात अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

**<u>पाउस</u>**-गडचिरोली,रत्नागिरी,बीड,अमरावती,वाशीम,परभणी,हिंगोली,धुळे/पीटीसी,मुं.प्रा,/सविता

राज्यात सर्वदूर पाउस पडत असून, जनजीवन विस्कळीत झालं आहे. अनेक ठिकाणी नद्यांनी धोक्याची पातळी ओलांडली असून, पिकं  पाण्याखाली गेली आहेत.

वाशीम जिल्ह्यात सलग दुसऱ्या दिवशी मुसळधार पाऊस झाल्याने अडाण प्रकल्पाच्या सांडव्याचे दरवाजे उघडण्यात आले आहेत. अडाण नदी, काटेपूर्णा नदी, पैनगंगा नद्या ओसंडून वाहत आहेत.

हिंगोली जिल्ह्यातील ईसापुर धरणाच्या पाणलोट क्षेत्रात जोरदार पाऊस सुरू असल्यानं ईसापुर धरणाचे दरवाजे उघडून पाण्याचा विसर्ग वाढविण्यात येत असून पैनगंगा नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

गडचिरोलीसह जिल्ह्याच्या विविध तालुक्यांमध्ये पडत असलेल्या जोरदार पावसामुळे नदी-नाल्यांना पूर आला आहे. पुरामुळे अनेक मार्गांवरील वाहतूक बंद आहे.

रत्नागिरी जिल्ह्यात कालही पावसाची संततधार सुरु होती. खेड तालुक्यातील जगबुडी नदीनं काल संध्याकाळी इशारा पातळी ओलांडली. जिल्ह्यातील अनेक तालुक्यांमध्ये गेल्या दोन दिवसांत १०० मिलीमीटरहून जास्त पाउस झाल्याची नोंद झाली आहे.

रायगड जिल्ह्यात नद्यांच्या पातळीत मोठी वाढ झाली आहे. रोह्याच्या कुंडलिका नदीनं इशारा पातळी ओलांडली आहे तर नागोठण्याची आंबा नदी इशारा पातळीवरून वाहत आहे. प्रशासनानं नदी किनाऱ्यावरील गावांना सतर्कतेचा इशारा दिला आहे. दक्षिण रायगडमध्ये पावसाचा जोर अधिक आहे.

बीड जिल्ह्यात जोरदार पावसामुळे मांजरा धरण ९० टक्के भरलं असून काल दुपारनंतर धरणाचे चारही दरवाजे उघडण्यात आले असून नदी काठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. माजलगांव तालुक्यात गेल्या तीन दिवसांपासून पडत असलेल्या जोराच्या पावसामुळे पिकं पाण्याखाली गेली आहेत.

यवतमाळमध्ये वीज पडून एकाचा मृत्यू झाला आहे . नदी काठच्या शेतजमिनींमध्ये पाणी घुसल्यानं पिकांचं मोठ्या प्रमाणावर नुकसान होण्याची शक्यता आहे.

लातूर जिल्ह्यात निम्न तेरणा प्रकल्पाचे दहा दरवाजे काल सकाळी उघडण्यात आल्यानंतर नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

राज्यात निर्माण होत असलेली पूरसदृश परिस्थिती लक्षात घेता प्रशासनामार्फत राष्ट्रीय तसंच राज्य आपत्ती प्रतिसाद दलांना सतर्क राहण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत.

**<u>हवामान</u>**

हवामान - राज्यात पुढील चार दिवस अतिवृष्टीसह वादळी पाउस पडण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे. कोकण तसंच घाट परिसरात अतिवृष्टी तर मराठवाड्यात काही ठिकाणी जोरदार पावसाची शक्यता आहे. या कालावधीत समुद्र खवळलेला राहणार असून, मासेमारांनी समुद्रात जाण्याचं टाळावं असं आवाहन करण्यात आलं आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.**

**नमस्कार.**